महसूल विभाग

## वडार समाजातील कुटुंबांना २०० ब्रासपर्यंत दगडावरील रॉयल्टीत सूट

हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या वडार समाजातील कुटुंबांना शासकीय आणि खाजगी जमिनीवर २०० ब्रासपर्यंतच्या दगडावर स्वामित्वधन (रॉयल्टी) आकारणीपासून सूट देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. २०० ब्रासपेक्षा जास्त दगड फोडल्यास प्रचलित दराने रॉयल्टी आकारण्यात येईल.

पिढीजात कुंभारांना मातीवर रॉयल्टी न आकारण्याचा निर्णय यापूर्वीच शासनाने घेतला असून वडार समाजाची मागणी होती. वडार समाजातील लोक उपजिविकेसाठी या दगडफोडीसारख्या कष्टाच्या व्यवसायावर अवलंबून असतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक लाभासाठी रॉयल्टीत सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----